# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## निविदा सुचना

जा.क्र.नांवाशमनपा/मलनिस्सारण/ 7910 /२०२३ दिनांक 14 SEP 2023

महाराष्ट्र शासना कडील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण महामंडळ / सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन निविदा मागविण्यात येत आहे. निविदा फक्त महानगरपालिकेच्या नोंदणीकृत ठेकेदारांना नांदेड महापालिकेच्या वेब साईट https//: mahatenders.gov.in वरुन खरेदी करता येईल. निविदेच्या अटी व शर्ती वरील वेब साईटवर नमुद असतील, निविदा फक्त इंटरनेटवरुन खरेदी करता येतील व इंटरनेटवरुनच भरता येतील. सर्व कंत्राटदाराना Digital Signature चे रजीस्ट्रेशन करणे अनिवार्य आहे. नियम व अटी कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनिसारण विभाग यांचे कार्यालयात व मनपा नोटीस बोर्डावर पहावयास मिळतील.

### ई-निविदा प्रक्रियेचे वेळा पत्रक

| अ.क्रं. | तपशील | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | ई निविदा प्रकाशीत करणे | 15/9/2023 | १५.०० |
| २ | ई निविदा डाऊनलोड करणे | 15/9/2023 | १५.०० |
| ३ | ई निविदा भरणे | 15/9/2023 | १५.०० |
| ४ | ई निविदा भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ | 29/9/2023 | १५.०० |
| ५ | ई निविदा ऊघडणे | 03/10/2023 | १५.०० |

| अ.क्र | कामाचे नांव | कामाची अंदाजित रक्कम | इसारा रक्कम १% | अनामत रक्कम २% | को-या निविदेची किंम्मत विक्रिकरा सहित +२८%GST | कामाची मुद्त |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड हद्दीत प्रभाग क्र. १४ चैतन्यबापु देशमुख यांचे घर ते नांदेडकर यांच्या घरापर्यंत ड्रेनेज लाईन करणे. | ७,१६,८५८/- | ७,१६९/- | १४,३३७/- | ६४०/- | ६ महिने |

अतिरीक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

प्रतिलिपी :-

१) संपादक, दैनिक नांदेड मजदूर / दै. बहुरंगी वार्ता यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील निविदा सुचना आपल्या अंकात दि. 15/9/2023 च्या दैनिकात कमीत कमी स्तंभ वापरुन 12 X 12 चौ.से.मी. मध्ये शासकिय दराप्रमाणे प्रसिध्द करुन अंकात तीन प्रति व बिलाच्या दोन प्रतिसह कार्यालयात शासनमान्य दराची प्रत जोडून सादर करावे.

२) सिस्टीम मॅनेजर, ई-टेंडरींग, संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

३) नोटीस बोर्ड, मुख्य कार्यालय, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

अतिरीक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

# निविदा अटी व नियम

१. कंत्राटदाराने कोरी निविदा प्रपत्रे विकत घेण्याकरीता करावयाच्या अर्जासोबत खालील बाबी तांत्रीक लिफाफा सादर करणे आवश्यक आहे.
२. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण महामंडळ/ सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या कडील योग्य त्या वर्गातील कंत्राटदार नोदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.
३. EMD व Tender Fees Online भरल्याची पावती.
४. पॅन कार्ड
५. जी.एस.टी.कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे.
६. शासकीय कायदान्वये EPF व ESIC भरण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची असेल व त्याचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक.
७. कंत्राटदाराने मागील तीन वर्षाचा आयकर (२०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ पर्यंत) चा भरणा केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
८. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०(फ) नुसार महापालिका पदाधिकाऱ्यांचे निविदा संदर्भात प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे प्रामणपत्र निविदाधाकरांना लेटर हेडवर सादर करणे बंधनकारक राहील.
९. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सीएटी-२०२२/प्र.क्र./इमा-२ दि.११.०५.२०२२ अन्वये कंत्राटदाराने सर्व कागदपत्रे खरी असल्या बाबतचे प्रतिज्ञापत्र १००/- स्टॅम्प पेपरवर प्रत्येक निविदेसाठी स्वतंत्र कामाचे नांव टाकून जोडणे बंधनकारक आहे. लिफाफा क्रं.१ मध्ये तसेच निविदा मंजुरी व नंतर देयके अदा करतांना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निविदा उघडल्यानंतर निदर्शनास आल्यास कंत्राटदार पुर्णपणे जबाबदार राहतील. मनपाने कोणताही अधिकारी जबाबदार असणार नाहीत.
१०. निविदा धारकाला काळ्या यादीत टाकले नसल्या बाबत स्वयंघोषणा पत्र
११. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नियम २०१८ प्रमाणपत्र

## इतर अटी व शर्ती

१. अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या निविदा भरल्यास सा.बां.विभागाचा शासन निर्णय क्रं.सी.ऐ.टी.२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२७.०९.२०१८ मधील शुध्दीपत्रक दि.२८ नोव्हेंबर २०१८ नुसार लिफाफा क्रं.१ व लिफाफा क्रं.०२ उघडल्यानंतर प्रथम न्युनदेकार सादर करणाऱ्या L१ निविदाकाराने ``Additional Performance Security`` ०७ दिवसाच्या आत संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडे जमा करावे.
२. Defect Liability Period हा महाराष्ट्र शासन सा.बां.वि.शासन निर्णय क्रं.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१५१/इमारी-२ दि.१४.०१.२०१९ अन्वये राहिल.
३. कंत्राटदारांना कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यानंतर शासकीय विमा कंपनीकडून विमा पॉलीसी अनिवार्य आहे.
४. निविदा धारकाने कोरी निविदेची किंमत (Tender fee) व इसारा रक्कम (EMD) ची रक्कम ऑनलाईन / पेमेंट गेटवे द्वारे भरणा करावी.
५. पहिल्या लिफाफ्यात कागदपत्रे योग्य असल्याची खात्री झाल्याशिवाय दुसरा लिफाफा उघडण्यात येणार नाही व त्याबाबत निविदाधारकाची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
६. निविदाची ऑफर निविदाधारकास ९० दिवस बंधनकारक राहील.
७. प्राप्त झालेल्या निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी निविदा समितीसमोर उघडण्यात येतील.सदरील बाबतीत पुर्वसुचना संबंधित निविदाधारकास देण्यात येइल.
८. सदरील कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित झाल्यापासुन निविदेत दर्शविलेल्या कालावधीच्या (१ वर्षाच्या) आत काम पुर्ण करावे लागेल. दिलेल्या कालावधीत काम पुर्ण न केल्यास निविदा अटीप्रमाणे दंड लावण्यात येईल. कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी विहीत नमुन्यात करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.
९. कामाचे अंदाजपत्रक, नकाशे कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनि:स्सारण विभाग यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत सुटटीचे दिवस वगळुन पहावयास मिळतील.
१०. इतर नियम व अटी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेडच्या सुचना फलकावर तसेच कार्यकारी अभियंता,पाणी पुरवठा व मलनि:स्सारण विभाग यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
११. काम सुरु करण्यापूर्वी, काम सुरु असतांना व काम पूर्ण झाल्यावर कामाचे Geo Tag फोटो काढावे. सदरील फोटो कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.
१२. निविदा पुस्तिकेतील सर्व अटी व शर्ती लागु राहतील.
१३. कोणत्याही कारणाशिवाय एक किंवा सर्व निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त,नांवाशमनपा,नांदेड यांनी राखून ठेवला आहे.
१४. Royalty, TPTA. GST ची रक्कम नियमानुसार अदा / कपात करण्यात येईल.

अतिरीक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

E:Drive/Shastrioffice files/New OfficefDoc/.